# प्रकरण दुसरे

# बार्शी नगरपालिकेच्या ऐतिहासिक आढावा

# प्रकरण दुसरे
# बार्शी नगरपालिका स्थापनेपासुनचा ऐतिहासिक आढावा

ग्रामसंस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उदयाचे टप्पे.

बार्शी नगरपालिकेची १४२ वर्षे.

बार्शी नगरपालिकेची स्थापणा.

नगरपालिकेचा घटनात्मक इतिहास - १. स्वातंत्र्यपूर्व २ . स्वातंत्र्योत्तर

बार्शी नगरपालिका आणि ब्रिटीश सरकारचे वर्चस्व

बार्शी नगरपालिका आणि राज्य सरकारचे परस्परसंबंध

# प्रकरण दुसरे
# बार्शी नगरपालिका स्थापनेपासुनचा ऐतिहासिक आढावा

## ग्रामसंस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय :

बार्शी शहर हे नक्की केव्हा वसले हे निश्चित सांगता येत नाही. कारण तशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाही. परंतु 'जोगा परमनंदाच्या' माहितीवरुन हे शहर अंदाजे ७०० वर्षापूर्वी वसले असावे असे अनुमान काढता येते. धुळे नगरपालिकेने आपल्या महोत्सव - ग्रंथामध्ये ग्रामसंस्थांच्या उदयाबद्दल उद्बोधक अशी माहिती दिली आहे. त्यात असा उल्लेख अढळतो की, " आपल्या भारताचा अतिप्राचीन ग्रंथ जो ऋग्वेद आहे. या ग्रंथामध्ये ग्रामसंस्थांचा उल्लेख सापडतो. यावरुन भारतात फार प्राचीन काळीसुध्दा लोकशाही तंत्राने राज्यकारभार चालू असल्याचे दिसून येते. ब्रिटीशांच्या कारकीर्दीपूर्वीच भारतामध्ये गणराज्याची पध्दती होती." भारतीय तत्वज्ञानाच्या आधारावर स्वामी विवेकानंद परमहंस यांनी अमेरिका व युरोप खंडात भारतीय समाजव्यवस्थेतील गणराज्य तत्वज्ञानाचा प्रसार केला. भारताव्यतिरिक्त इतर देशांमध्ये निरनिराळ्या संस्कृती उत्पन्न झाल्या व विलीनही पावल्या परंतु भारतावर अनेक आक्रमणे होऊनसुध्दा भारतीय संस्कृती प्राचीन काळापासुन आजपर्यंत टिकून राहीली. याचे कारण ती ग्रामराज्यावर आधारलेली होती. प्राचीन ग्रामसंस्था व ब्रिटीशकालीन स्थानिक स्वराज्य संस्था यात अंतर असले तरी त्यांची तत्वप्रणाली एकच आहे. प्राचीन ग्रामसंस्थात जातीभेदांमुळे सर्वांना समान हक्क असावेत असे दिसून येत नाही. आधुनिक काळात स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही तत्वावर आधारलेल्या आहेत आणि सर्वांना समान हक्क असावेत हे त्यांचे मुळ तत्व आहे.

आधुनिक काळात भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याकरीता ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी सरकारने इ. स. १८४२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा

कायदा पास केला. त्याचा उद्देश मात्र बादशहा सरकारसाठी पैसा गोळा करण्याचा व जिल्हाधिकाऱ्यांचे काम हलके करणे एवढाच मर्यादित होता. या कायद्यामध्ये 'स्थानिक स्वराज्य संस्था' स्थापण करण्यासाठी स्थानिक लोकांनीच पुढाकार घेऊन आपल्या शहरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापण करावी अशी विनंती केल्यानंतरच ती स्थापण करण्यात येईल अशाप्रकारचे कलम होते. परंतु लोकांना असे वाटले की , अशी स्थानिक संस्था स्थापल्याने त्याच्या खर्चाची सर्व जबाबदारी आपल्यावर पडेल व याकरता कर रुपाने आपल्याला पैसा दूयावा लागेल. या भितीपोटी वरील कायदा होऊनसुध्दा अशा स्थानिक स्वराज्य संस्था सुरुवातीस स्थापण झाल्या नाहीत व ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा कायदा तसाच दप्तरात पडुन राहिला.

त्यानंतर सन १८५० साली पुन्हा एक नवीन कायदा करण्यात आला व पुर्वीच्या कायद्यातील दोष काढुन टाकण्यात आले. या कायद्याने नागरिकांवर प्रत्यक्ष कर बसवून पैसा गोळा करु नये असे नवीन तत्व सुचविण्यात आले. व हा नवीन कायदा बंगालपुरता मर्यादित न ठेवता सर्व भारतभर लागु करण्यात आला. मात्र लोकांनी स्वयंस्फुर्तीने मागणी केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था स्थापण केली जाणार नाही. असे या वेळीही सरकारने जाहीर केले होते.

वरील कायदूयाने जनतेवर प्रत्यक्ष बोजा बसणार नसल्यामुळे भारतामध्ये निरनिराळ्या ठिकाणी नगरपालिका स्थापण होऊ लागल्या. महाराष्ट्रामध्ये सोलापूर जिल्ह्यात सांगोला यागावी प्रथम नगरपालिका स्थापण करण्यात आली. ही सांगोला नगरपालिका महाराष्ट्रातील सर्वात जुनी नगरपालिका म्हणावी लागेल. सांगोला नगरपालिकेच्या स्थापणेनंतर मात्र महाराष्ट्रामध्ये बहुतेक शहरांमध्ये लागोपाठ नगरपालिका स्थापण झाल्याचे दिसून येते. सोलापूर नगरपालिका १८५२ तर बार्शीची नगरपालिका ही १८६५ मध्ये स्थापण झाली.

बार्शी नगरपालिकेचा अभ्यास करण्यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे राष्ट्राचा एक घटक म्हणून पाहिले पाहीजे. कारण राष्ट्राने स्वतंत्र सरकारची स्थापणा केली असली तरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यातुन वगळता येत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्व स्पष्ट करताना एन.पी. शर्मा असे म्हणतात की, " लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे."[१]

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उदयाचे टप्पे :

भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा आधुनिक काळात विकास अधिक झाला आहे. याबाबत डॉ. माहेश्वरी यांनी भारतामधील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे प्रमुख पाच टप्पे सांगितले आहेत. त्या प्रत्येक टप्प्याचे उद्देश व हेतू मात्र वेगळे होते.[२] या प्रत्येक टप्प्याची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. टप्पा पहिला ( १६८७ - १८८१ ) :

ब्रिटीशांची भारतात राजकीय सत्ता स्थापण झाल्यानंतर त्यांनी येथील स्थानिक कारभार सुव्यवस्थित व कार्यक्षमपणे चालावा म्हणून अनेक शहरांमध्ये नगरपालिकांची स्थापणा केली. यामागचा मुख्य उद्देश एवढाच होता की, वस्तुवरील जकात कर गोळा करणे होय. यातुनच भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था उदयास आली. परंतु स्थानिक व्यापाऱ्यांनी कर देण्यास नकार दिल्याने हा प्रयोग अयशस्वी ठरला.

' पुढे १७२६ मध्ये चार्टर ॲक्ट पास झाला. यानुसार नगरपालिकेच्या स्थापणेचा आदेश रद्द झाला. १७९३ च्या कायद्याने भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्था देण्यात आली. या संस्थेचा कारभार पाहण्यासाठी 'जस्टीस ऑफ पीस' यांची नियुक्ती करण्यात आली. व नियुक्तीचे अधिकार जनरलला देण्यात आले.'[३]

याप्रमाणे मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन शहरांमध्ये गव्हर्नर जनरलकडून अध्यक्षाची निवड करण्यात आली. या अध्यक्षांच्या मार्फत स्थानिक कारभार कार्यक्षम व व्यवस्थितपणे चालविण्यासाठी विशिष्ट असे प्रयत्न केले जात होते. ते शहरातील लोकांचे सामाजिक प्रश्न, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य याकडे लक्ष देत असत. त्याचप्रमाणे शांतता व सुव्यवस्थेसाठी पोलीस यंत्रणा राबवत असत. पाणीपुरवठा व वैद्यकिय सेवा अशा सुखसोईकरीता नागरिकांवर कर बसविला जात असे.

१८४२ मध्ये 'बंगाल कायदा' पास झाला. या कायद्यानुसार नगरपालिका प्रशासन जिल्हा स्तरापर्यंत पोहचले. शहरांमध्ये 'शहर समितीची' स्थापणा करण्यात आली. या समितीचा उद्देश असा होता की, लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे . त्यासाठी काही आर्थिक तरतुदी करण्यात आल्या. पण स्थानिक लोकांनी यास विरोध केला आणि कर देण्यास नकार दिला.

' १८५० चा कायदा ' हा पहिल्या टप्प्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासातील महत्वाचा कायदा म्हणून ओळखला जातो.'[४] हा कायदा पास होऊन देशांतर्गत ' म्युनिसिपल बोर्डाची' स्थापणा झाली. शहरे किंवा मध्यम प्रतिच्या गावातील नागरिकांनी सरकारकडे मागणी केल्यास नगरपालिकेची स्थापणा केली जात असे. १८५० ते १८५५ या अल्पकालावधीत अनेक लहान मोठ्या नगरपालिका अस्तित्वात आल्या . लोकशाहीच्या मार्गाने एकत्र येऊन सार्वजनिक कार्य करण्याची व अनुभव घेण्याची संधी नागरिकांना मिळाली.

**लॉर्ड मेयोने पास केलेला ठराव ( १८७० ) :**

लॉर्ड् मेयोने पास केलेल्या ठरावानुसार सन १८६९ ते १८७२ या दरम्यान भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासात मोलाची भर पडली. १८७० मध्ये मेयोने आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव पास केला. या ठरावानुसार आर्थिक विकास व भारतीय लोकांचा प्रशासनात सहभाग वाढविण्यासाठी त्याने सत्तेचे विकेंद्रीकरण केले. यापूर्वी केंद्राकडे

एकवटलेली सत्ता प्रांताकडे वर्ग करण्यात आली. केंद्राकडील काही खाती राज्याकडे सुपूर्त करण्यात आली. उदा. शिक्षण , आरोग्य , रस्ते ,इत्यादींच्या खर्चासाठी लागणारी आर्थिक तरतुद राज्यांनी करातून उभी करावी.

**२) टप्पा दुसरा (१८८२ - १९१९) :**

**अ) लॉर्ड रिपनचा १८८२ चा ठराव :**

लॉर्ड रिपनने १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा पास केला. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे ते 'लोकशिक्षण व राजकारणाचे धडे देणारे हत्यार' म्हणून पहात होते. १८८२ चा ठराव पास झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यपध्दतीत मुलभूत बदल झाल्याचे अढळून येतात.[५] यामध्ये प्रामुख्याने भारतीय लोकांना राजकारणामध्ये सहभागी होता येणार होते. राजकारणातील आपले स्थान वाढवून प्रशिक्षण मिळणार होते. स्थानिक विकासाबरोबर लोकांच्या कल्पकतेला वाव मिळणार होता.[६] या संस्थांच्या विकासाबाबत असे सांगता येईल की, या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारामध्ये प्रशासकीय हस्तक्षेप किंवा उपदेशात्मक तंत्र असता कामा नये.

**ब) विकेंद्रीकरणासाठी रॉयल कमिशन ( १९०८ ):**

सन १९०८ मध्ये ' रॉयल कमिशनची ' स्थापना करण्यात आली. कारण स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास लॉर्ड रिपनच्या अहवालानुसार न करता तो खालील तत्वानुसार करण्यात यावा हा या कमिशनच्या पाठीमागचा मुख्य उद्देश होता . ती तत्वे खालीलप्रमाणे.[७]

१. प्रत्येक खेड्याला स्थानिक स्वराज्य संस्थेचा मूळ घटक म्हणून मान्यता द्यावी. प्रत्येक खेड्यात ग्रामपंचायतीची स्थापणा करण्यात यावी.

२. स्थानिक सभासद बहुमताने निवडले जावेत.

३. म्युनिसिपलिटीनी त्यांचा 'अध्यक्ष' सभासदांमधून निवडावा.

४. म्युनिसिपलिटीनी त्यांना लागणाऱ्या खर्चाची अर्थिक तरतुद त्यांनी स्वत: करावी.

५. शहरातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी स्विकारावी.

### ३. टप्पा तिसरा ( १९२० - १९३९ ) :


१९१९ च्या मॉन्टेग्यू चेम्सफोर्डच्या अहवालानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचा तिसरा टप्पा सुरु होतो. मॉन्टेग्यू चेम्सफोर्डच्या अहवालात असे म्हटले आहे. "स्थानिक मंडळावर जास्तीत जास्त नियंत्रण जनतेचे असावे. आणि ती मंडळे बाह्य नियंत्रणापासुन मुक्त असावीत."[८] या कायद्यानुसार प्रातांना जबाबदार शासन पध्दती निर्माण करण्यात आली.

तसेच राज्यकारभाराच्या सोईनुसार काही खाती केंद्राकडे व काही खाती प्रांताकडे सोपविण्यात आली. [९] प्रांताकडे सोपविलेल्या खात्याचे कायदे करण्याचा अधिकार प्रांताच्या विधिमंडळाकडे देण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, बांधकाम , शिक्षण , महसूल, पाणीपुरवठा , वन , सहकारी संस्था , यासारखी खाती प्रांताच्या यादित समाविष्ठ करण्यात आली. प्रांतिक सरकारला भारतमंत्री जबाबदार राहील अशी तरतुद करण्यात आली.

### ४. टप्पा चौथा - ( १९३७ - १९४७ ) :

१९३५ च्या कायद्याने प्रांतिक सरकारला पूर्ण स्वायत्तता देण्यात आली.[१०] तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेवर भारतमंत्र्याचे नियंत्रण होते आणि त्यांना काही विशेषाधिकारही मिळाले होते. कारण विकासकामासाठी लागणारा पैसा व त्यासंबंधीचे अर्थखाते सुपूर्त करण्यात आले होते. आर्थिक विकासाची रुपरेषा ( आराखडा ) आखण्याचा अधिकार स्थानिक समित्यांना मिळाला होता. दुसऱ्या महायुध्दानंतर परिस्थिती बदलली. भारतमंत्र्यांनी राजीनामा दिला . परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाला पुन्हा खिळ बसली.

सन १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थेस महत्व प्राप्त झाले. सन १९४८ ला केंद्रिय आरोग्यमंत्री राजकुमारी अमृता कौर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रांतातील स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सर्व मंत्र्यांना



बार्शी नगरपालिकेची इमारत

बैठकीस बोलावून सभा घेण्यात आली. त्यावेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु हे त्या बैठकीस हजर होते. त्यांनी आपल्या भाषणात असे म्हटले आहे की , " स्थानिक स्वराज्य संस्था ह्या खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया आहेत. वास्तविक पाहता आपल्याला उच्च लोकशाहीविषयी विचार करण्याची सवय लागायला हवी तरच उच्च लोकशाहीचा पाया भक्कम होईल."[११]

५. टप्पा पाचवा ( १९५० ते पुढे ) :

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचा पाचवा टप्पा भारतीय राज्यघटनेने विकसित केला. सन १९५० ला राज्यघटनेने सर्व राज्यांना स्थानिक स्वराज्याचा दर्जा दिला. सन १९५० पासुन स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये बरेच महत्वपूर्ण बदल होत गेले. या संस्थेचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या कमिट्या निर्माण केल्या गेल्या. १९४९ ला ' लोकल फायनांन्स इन्क्वायरी ' कमिटी स्थापण केली. या कमिटीने १९५७ ला आपला अहवाल सदर केला. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत होण्यासाठी नवीन उत्पन्नाची वर्गवारी केली. स्वतंत्र भारतातील लोकशाही सरकारच्या वाढत्या प्रोत्साहनामुळे स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम व कर्तव्यक्षम होत आहेत. नागरिकांच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडीत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांबद्दलची पूर्वग्रह दुषित उदासिनता सोडून त्या सुधारण्यासाठी शक्य ते प्रयत्न करणे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. १९९३ व ९४ च्या ७३ व ७४ च्या घटनादुरुस्तीने ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्ततेचा दर्जाही देण्यात आलेला आहे.

## बार्शी नगरपालिकेची १४२ वर्षे :

### बार्शी नगरपालिकेची स्थापणा :

बार्शी नगरपालिकेची स्थापना दिनांक २४ ऑगस्ट १८६५ या दिवशी झालेली आहे. १८५० मध्ये 'अधिनियम क्रमांक-२६' मंजूर करुन शहराची स्वचछता या मर्यादित

उद्दिष्टासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती झाली. सन १८७१ ते ७४ याकाळात विविध अधिनियम संमंत करण्यात आले. सन १८७३ च्या अधिनियमान्वये नगरपालिकांना " निगम निकाय " (कापेरिटेड बॉडी) स्वरुप प्राप्त झाले. सन १९०१ साली " डिस्ट्रीक्ट मुंबई ॲक्ट " व १९२५ साली " बॉम्बे म्युनिसिपल बरो ॲक्ट " संमत झाले.

" बॉम्बे म्युनिसिपल बरो ॲक्ट १९२५" बार्शी नगरपालिकेस १ / १०/ ३६ रोजी लागू करण्यात आला . ऑक्टोबर १९६१ मध्ये नगरपालिकेने या अधिनियमाचा रौप्य महोत्सवही साजरा केलेला आहे. मुंबईचे राज्यपाल मा. श्री. प्रकाश हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. १९६५ मध्ये नगरपालिकेच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याने शताब्दी समारंभाचाही सोहळा पार पडलेला आहे. प्रमुख पाहुणे म्हणून मा. पद्मभूषण हरिभाऊ पाटसकर व तत्कालीन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे विनायकराव पाटील हे उपस्थित होते.

स्वातंत्र्योत्तर कालावधीनंतर म्हणजे मे १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राज्यात समाविष्ट भागांचा विचार करता खालीलप्रमाणे नगरपालिकांना विविध असे अधिनियम लागू झाले.

| | | |
|---|---|---|
| १. पश्चिम महाराष्ट्रातील १३ जिल्हे : | अ. | बॉम्बे डिस्ट्रीक्ट म्युनिसिपल ॲक्ट |
| | ब. | बॉम्बे म्युनिसिपल बरो ॲक्ट - १९२५ |
| २. विदर्भातील ८ जिल्हे : | अ. | सी.पी. ॲन्ड बरोज म्युनिसिपल ॲक्ट १९२२. |
| ३. मराठवाड्यातील ५ जिल्हे : | अ. | हैद्राबाद डिस्ट्रीक्ट म्युनिसिपल ॲक्ट १९५६ |

राज्यातील सर्वच नगरपालिकांना एकच अधिनियम असावा यासाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती नियुक्त करुन तिच्या शिफारशीनुसार "महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम - १९६५" मंजूर केला . जुलै १९६३ मध्ये शासनाने अधिनियमाच्या

संकलनाकरीता विशेष समिती नियुक्त केली होती. दि. २१ ऑक्टोबर १९६४ रोजी समितीने आपला अहवाल सादर केला. बिल क्रमांक -१०/१९६५ महाराष्ट्र शासनाचे राजपत्र भाग - ४ अ (असाधारण) दि. - २६ /३/१९६५ पृष्ठ क्र. ६०ते ६२ वर प्रसिध्द करण्यात आले. दिनांक १० / ९ / १९६५ रोजी अधिनियमाचे कलम २, ४,९ ते ३९ , ७४ , २९० (१,२,३) २९९ , ३२१ , ३४२ (१,२,३,४,१४ ) ३४५ , ३५१, व परिशिष्ट - अ आंमलात आणले. दिनांक २७ ऑक्टोंबर - १९६२ रोजी ३१८ ( अ ) आंमलात आणले. दिनांक २५ जून १९६६ रोजी अधिनियमाच्या उर्वरीत सर्व तरतुदी आंमलात आणल्या अधिनियमात एकूण - २९ प्रकरणे असून ३१५ कलमे व ९ अनुसूचि यांचा समावेश यामध्ये आहे.

**लोकसंख्या :**

नगरपालिकेच्या कोणत्याही माहितीची सुरुवात करीत असताना शहराच्या लोकसंख्येचा प्रथम विचार करणे क्रमप्राप्त ठरते. शहराची लोकसंख्या कशाप्रकारे वाढत गेली आहे. याची माहिती महत्वाची ठरते. बार्शी शहराची लोकसंख्या उपलब्ध माहितीनुसार खालीलप्रमाणे अढळून येते.

‘ नगरपालिका स्थापणेच्या वेळी बार्शी शहराची लोकसंख्या सुमारे १५, ०००एवढी होती.’

| सन | लोकसंख्या |
|---|---|
| १८८१ | १६,१२५ |
| १८९१ | २०,५६९ |
| १९०१ | २४,२४२ |
| १९११ | १६,७०४ |
| १९२१ | २०,४४९ |
| १९३१ | २५,७५४ |

| सन | लोकसंख्या |
|---|---|
| १९४१ | ३४,८३७ |
| १९५१ | ४१,९६० |
| १९६१ | ५०,३८९ |
| १९७१ | ६२,३९७ |
| १९८१ | ७२,५३७ |
| १९९१ | ८४,७०० |

पूर्वी नगरपालिकेकडून दरवर्षाला खानेसुमारी केली जात होती. १८८६ - ८७ ते १९०१ - १९०२ या कालावधीपर्यंत ही प्रथा होती. नंतर मात्र ती प्रथा बंद करण्यात आली. १९०१ आणि १९११ या खानेसुमारीचे आकडे विचारात घेता लोकसंख्या वाढीच्या ऐवजी घट झालेली आढळून येते. सन १९०१ मध्ये प्लेगच्या साथीचा फार मोठा प्रादुर्भाव झाला होता. त्या एका वर्षात २००० नी लोकसंख्या कमी झाल्याचे वार्षिक अहवालात नमूद आहे.

**नगरपालिकेचा घटनात्मक इतिहास :**

नगरपालिकेची स्थापणा जरी १८६५ साली झाली असली तरी सन १८९२ पर्यंत लोकनियुक्त प्रतिनिधींचा समावेश असणारे मंडळच अस्तित्वात नव्हते. नगरपालिकेच्या मंडळात त्यापूर्वी सर्व सरकारनियुक्त व्यक्तिंचा समावेश असे. सर्वप्रथम ८ लोकनियुक्त व ८ सरकार नियुक्त सदस्यांचा समावेश असलेले मंडळ दि. १ / २ / १८९२ रोजी अस्तित्वात आले. हे अस्तित्वात असलेल्या रेकॉर्डवरुन स्पष्ट होते.

नगरपालिका स्थापन झालेल्या दिवशी म्हणजे २४ ऑगस्ट १८६५ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तावर खालील व्यक्तींच्या सहया अढळून येतात.

१. श्री. राजाराम गिरमाजी, मामलेदार , अध्यक्ष

२. श्री. गोपाळ जनार्दन, पेन्शनर मुनसफ

३. श्री. नारु नरहर पेन्शनर मामलेदार

४. श्री. सिद्राम शिवमूर्ती ऐनापूरे

५. श्री. मनोहर भगवंत शेटे

६. श्री. तुळजाराम मानसिंग

७. श्री. सीताराम गोविंद वकील

८. श्री. महादा रायप्पा देवणे

९. श्री. दाजी बाबाजी नरके

१०. श्री. नागो कोंडाजी बुरांडे

११. श्री. भिकाजी जगन्नाथ पेन्शनर

दिनांक १/२/१९९२ रोजी १६ सदस्यांचे मंडळ अस्तित्वात आले. त्यात ८ सदस्य सरकारनियुक्त व ८ सदस्य निवडून आलेले यांचा समावेश होता. जिल्हाधिकारी हेच अध्यक्ष असून उपाध्यक्ष हे मात्र स्थानिक सभासदांपैकी नेमले जात होते. साधारणत: उपाध्यक्षांच्या सहीने सर्व कारभार चालत असे.

लोकनियुक्त सदस्यांचा समावेश केल्यानंतर पहिले उपाध्यक्ष पदाचा मान धारण करणारी व्यक्ती नारायण राजाराम मूळे ही होय. निवडून आलेल्या ८ सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.

१. नरसाप्पा गुराप्पा

२. कोंडी अमूत वकील

३. रामचंद्र बाळकृष्ण नखाते

४. महादेव विठोबा घोडके

५. गंगाराम विठ्ठलदास नागर

६. अजमोद्दीन अमरुद्दीन काझी

७. उत्राप्पा भूजाप्पा सोनके

८. यशवंत भगवंत देशपांडे

सन १९०१ मध्ये नगरपालिकेच्या घटनेमध्ये फरक झाल्याचे आढळुन येते. बदललेली घटना पुढीलप्रमाणे,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पदसिध्द सदस्य | : | २ |
| २. | नामनिर्देशित सदस्य | : | ५ |
| ३. | जनतेकडून निवडलेले सदस्य | : | ११ |

एकूण सदस्य संख्या १८ झाली.

या घटनेप्रमाणे ऑगस्ट १९०१ मध्ये सार्वजनिक निवडणूक होऊन १-१०-१९१० पासुन हे मंडळ अस्तित्वात आले.

सन १९२२ मध्ये शहराचे चार भाग पाडून सरकारनियुक्त ४ आणि निवडलेले १६ सदस्य अशी एकूण २० सदस्यांची संख्या करण्यात आली. या घटनेप्रमाणे नवीन लोकनियुक्त मंडळ दि. १/१०/१९२२ पासुन अस्तित्वात आले. मामलेदार हे सरकारनियुक्त सदस्यांपैकी एक असून सन १९३७ पर्यंत हीच परिस्थिती चालू राहिलेली आहे. १९२५ पासुन यामध्ये एक महत्वाचा बदल करण्यात आला तो म्हणजे मुसलमान जमातीसाठी एक स्वतंत्र मतदारसंघ अस्तित्वात आणला गेला.

सरकारी ठराव क्र. ११/१९८८/३३ दिनांक २०/४/३७ अन्वये घटनेतील बदल मंजूर करण्यात आला. एकून सदस्यसंख्या २४ एवढी करण्यात आली. यापैकी २२ सदस्य प्रत्यक्ष जनतेकडून निवडलेले व २ सदस्य सरकारनियुक्त ठरविण्यात आले. या घटनेनुसार दिनांक २२ / ११ / १९३७ रोजी निवडणूक होऊन मंडळ अस्तित्वात आले. सर्वसाधारणपणे प्रभाग आणि जागांची संख्या खालीलप्रमाणे होती.

| प्रभाग क्रमांक | राखीव / सर्वसाधारण | निवडून द्यावयाच्या जागा |
|---|---|---|
| १. | सर्वसाधारण | ५ |
| २. | सर्वसाधारण | ३ |
| ३. | सर्वसाधारण | ५ |
| ४. | सर्वसाधारण | ४ |
| ५. | मुसलमान जनरल प्रभाग | ३ |
| ६. | दलित जनरल प्रभाग | २ |
| | एकूण | २२ |
| | सरकार नियुक्त सदस्य | २ |
| | एकूण | २४ |

१/१०/१९३६ पासुन बार्शी नगरपालिकेस बॉम्बे म्युनिसिपल बरो ॲक्ट लागू करण्यात आला. या अधिनियमाच्या तरतुदीनुसार जी घटना मंजूर करण्यात आली. तेंव्हापासून सरकार नियुक्त सदस्य पध्दत पूर्णता बंद करण्यात आली. या नवीन घटनेनुसार पहिली निवडणूक २२ / ११ / १९३७ मध्ये घेण्यात आली.

सरकारी ठराव क्रमांक २८११/३३ दि. १३/४/१९४१ अन्वये घटनेत पुन्हा बदल करण्यात आला. एकूण सभासद संख्या २४ ऐवजी २५ करण्यात आली. स्त्रियांसाठी एक जागा राखीव ठेवण्यात आली. एकूण प्रभागांच्या संख्येतही ४ ऐवजी ६ इतकी वाढ करण्यात आली. या घटनेनुसार ६ जानेवारी १९४१ रोजी निवडणूक होऊन मंडळ अस्तित्वात आले. स्त्री राखीव जागेवर निवडून येण्याचा पहिला मान सौ. भगीरथीबाई शंकर जायगावकर या महिलेने पटकावला आहे.

**बार्शी नगरपालिका आणि ब्रिटीश सरकारचे वर्चस्व :**

बार्शी नगरपालिकेला अंतर्गत स्वायत्तता असली तरी ब्रिटीश सरकारच्या धोरणाविरुध्द कोणताही निर्णय नगरपालिकेला घेता आला नव्हता . आणि जर तो

घेतला तर सरकार नगरपालिकेवर दबाव आणुन घेतलेला निर्णय मागे घेण्यास भाग पडत असे. असाच प्रसंग बार्शी नगरपालिकेंवर दि. ३/९ / १९४० रोजी आला होता. तो म्हणजे "महात्मा गांधीचा पुतळा बार्शी शहरात बसवावा असा होता. बार्शी नगरपालिकेने ठराव क्रमांक - १५७ करुन नगराध्यक्ष श्री. भगवंतराव संभुआप्पा कथले यांच्या काळात महात्मा गांधी यांचा पुतळा बार्शी शहरामध्ये बसविण्याचा निर्णय घेतला. यासाठी मुंबई येथील शिल्पकारास पुतळ्याची ऑर्डरही दिली. यासाठी २, १०० रुपये खर्च येणार होता. परंतु याचवेळी मे. कलेक्टर व मे. कमिशनर यांच्याकडून पुतळा बसविण्याचा ठराव सस्पेंड केल्याचा हुकूम सरकारी पत्र क्र. एस १५७१२४२ ( अ) तारीख ३ /४ / १९४१ रोजी दिला. सरकारच्या दबावामुळे बार्शी नगरपालिकेला आपल्या इच्छेप्रमाणे महात्मा गांधीचा पुतळा बसवता आला नाही. यावरुन असे म्हणता येईल की , नगरपालिकेवर ब्रिटिश सरकारची दहशत होती." [१२]

सन १९३५ ला डॉ. राजेंद्र प्रसाद हे बार्शीला आले. बार्शी काँग्रेस कमिटीतर्फे त्यांचा सत्कार व जाहिर व्याख्यान येथील तेलगिरणी चौकामध्ये झाले . बार्शी नगरपालिकेनेही त्यांचा सत्कार करण्याचा ठराव मुख्य सभेत पास केला. परंतु यावेळीही ब्रिटिश सरकारने दबाव आणून ठरावाला हरकत घेतली. त्यामुळे नगरपालिकेतर्फे त्यांना सत्कार झाला नाही.[१३]

पंडित जवाहरलाल नेहरु हे इंडियन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष असताना सन १९३७ ला बार्शीला आले. त्यावेळी मात्र बार्शी नगरपालिकेने त्यांना मानपत्र देऊन सत्कार केला. यावेळीही सरकारचा दबाव होताच.[१४]

जरी नगरपालिकेवर स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ब्रिटिश सरकारचा दबाव असल्यामुळे काही गोष्टी करता आल्या नाहीत तरीसुध्दा नगरपालिकेने खालील देशभक्तांना मानपत्र दिले.

| | | |
|---|---|---|
| १. | स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर | ता - १०/८/१९३७ |
| २. | काँग्रेस मंत्रीमंडळाचे स्थानिक स्वराज्यमंत्री खा. ल. भा. पाटील | ता - २८/९/३७ |
| ३. | देशभक्त बाळासाहेब खेर , पहिले मुख्यमंत्री | ता.- २०/२०/१९४० |
| ४. | आचार्य अत्रे | ता . - ३०/३/१९४६ |
| ५. | ना • जी .डी. वर्तक , स्थानिक स्वराज्यमंत्री मुंबई राज्य | ता- २०/८/४६ |
| ६. | क्रांतिवीर नाना पाटील | ता.- ११/५/१९४६ |
| ७ | ना. गुलझारी लाल नंदा , मजुरमंत्री , मुंबई राज्य | ता - २०/१/१९४७ |
| ८. | ना. वैकुंठलाल मेहता , अर्थमंत्री , मुंबई राज्य | ता - १५/४/४७ |
| ९. | ना. एम .पी. पाटील | ता - २७/४/४७ |
| १०. | ना. जी.डी. तपासे उदयोगमंत्री मुंबई राज्य | ता. १९४७ |

बार्शी नगरपालिकेने वरील मान्यवर व्यक्तींना मानपत्र देऊन सत्कार केला आणि तोही स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारची राजवट असताना. हे कार्य म्हणजे नगरपालिकेच्या प्रशासनातील महत्वाचा भाग मानावा लागतो. व आदरणिय व्यक्तिंना बोलावून युवकांच्यामध्ये प्रेरणा निर्माण करण्याचे कार्य ही नगरपालिकेने या माध्यमातून केले. [१५]

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले व बार्शी नगरपालिकेने संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दलही सन १९५५ - ५६ ला ठराव क्र. २८८ दि. १४/१/ १९५४ करुन मराठवाडा, विदर्भ व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. व हा ठराव पंतप्रधान पंडित नेहरु यांच्याकडे पाठविण्याचे ठरविले. त्यानंतर पुन्हा बोर्डाने ठराव क्र. २९४ ता. २५ /१/१९५६ करुन संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर सरकारने केलेल्या गोळीबाराबद्दल तीव्र निषेध केला व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होईपर्यंत दि.२७/१/१९५६

पासुन नगरपालिकेवर काळे निशाण लावले. यावरुन असे म्हणता येईल की , बार्शी नगरपालिकेच्या प्रशासनामध्ये राजकीय जबाबदारीचा भाग ही होता. व ही राजकिय जबाबदारी हे आपले नैतिक कर्तव्य समजून पार पाडली. राजकीयदृष्टया बार्शी नगरपालिकेचे प्रशासन स्वातंत्र्यपूर्व काळात कार्यक्षम होते. [१६]

**स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा बार्शी नगरपालिकेचा घटनात्मक विकास :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारी ठराव क्रं. २८११/३३ दि. २०/११/१९५० अन्वये नगरपालिकेच्या घटनेत पुन्हा महत्वाचा बदल करण्यात आला. सदस्यसंख्या २५ ऐवजी ३० करण्यात आली. अनुसूचित जातीकरीता ३ ऐवजी ४ राखीव जागा ठेवण्यात आल्या . व मंडळाची मुदत ३ वर्षाऐवजी ४ वर्षे करण्यात आली.[१७]

' महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' अस्तित्वात आल्यानंतर त्यामधील कलम - ९ ( २) मधील तरतुदीप्रमाणे नगरपालिकेची घटना मा. संचालकांनी आदेश क्र. आय.सी.एन./ ४०६५ / ( २) ३७४१४ दि. ३०/९/१९६५ अन्वये मंजूर केलेली आहे. या घटनेनुसार,

| | | |
|---|---|---|
| निवडावयाच्या एकून सभासदांची संख्या | : | ३० |
| स्त्रियांसाठी राखीव जागा | : | ३ |
| अनुसुचित जातीसाठी राखीव जागा | : | २ |

' हा आदेश मा. डब्ल्यू. जी. पाठक यांनी काढलेला असून तो महाराष्ट्र शासन राजपत्र भाग - १ असाधारण , पूणे विभाग , दि ३० / ९ / १९६५ पृ. क्र. ६८ ते ९३ वर प्रसिध्द आहे. '' मंजूर घटनेनुसार महत्वाचा बदल म्हणजे प्रभागांची संख्या सभासद संख्येइतकी झाली. ' एक उमेद्वार एक प्रभाग ' असा महत्वाचा बदल करण्यात आला. त्याचबरोबर अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना काढून टाकण्याचा अधिकार लोकनियुक्त मंडळाला देण्यात आला. एक उमेद्वारीय मतदारसंघाची पध्दती सर्वप्रथम या कालावधीत आंमलात आली. याचबरोबर विषय समित्यांच्या निवडणूकामध्येही महत्वाचे बदल करण्यात

आले. निवडावयाच्या सदस्यांमध्ये सदस्य संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व राहण्यासाठी एक संक्रमणीय पध्दतीचा अवलंब करण्यात आला.'[१८] राज्यशासनाने नवीन अधिनियमाच्या तरतूदी लागू करुन अस्तित्वातील लोकनियुक्त मंडळास मुदतवाढ देण्यात आली. या कार्यवाहीमुळे 'बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट - १९२५' च्या तरतुदीप्रमाणे शेवटचे व 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम - १९६५ ' च्या तरतुदीप्रमाणे पहिले लोकनियुक्त मंडळ हे एकच राहिलेले आहे.

**महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ :**

'बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट ' च्या तरतूदीप्रमाणे शेवटचे नगराध्यक्ष श्री. भि.रा. क्षिरसागर यांची निवड झालेली होती. त्यानंतर ' महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' अस्तित्वात आला. श्री बाळासाहेब उध्दव मनगिरे व श्री. अ. गन्नी यांनी अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. ' महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम - १९६५' च्या तरतूदीप्रमाणे निवडलेले पहिले लोकनियुक्त मंडळ दि. २ / ७ / १९६७ रोजी अस्तित्वात आले . या लोकनियुक्त मंडळाने मा. कौन्सिल ठराव क्र. ५२ दि. २/७/ १९६७ अन्वये कै. भाऊसाहेब झाडबुके अध्यक्ष व श्री. पी.डी. कारवा यांची उपाध्यक्ष म्हणून निवड केली.

'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम - १९६५ ' अस्तित्वात आल्यानंतर लोकशाही अधिक खोलवर रुजविण्यासाठी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना पदावरुन दूर करण्याचा अधिकार लोकनियुक्त मंडळाला देण्यात आला.

लोकनियुक्त मंडळाकडे देण्यात आलेला होता. त्याचा परिणाम म्हणून लोकनियुक्त मंडळामध्ये अविश्वासाचे प्रस्ताव येण्याचे प्रमाण वाढलेले दिसून येते. दि. २ / ४ / १९६७ रोजी अस्तित्वात आलेल्या लोकनियुक्त मंडळाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना पदावरुन दूर करण्यासाठी सुमारे १७ वेळा प्रस्ताव दाखल करण्यात आलेले होते. परंतु प्रत्यक्षात आवश्यक मते न पडल्याने ठराव समंत होऊ शकलेले नाहीत. या कारणास्तव शासनास या तरतुदीसंबंधी विचार करणे क्रमप्राप्त ठरलेले आहे.

या घटनादुरुस्तीमुळे अध्यक्षीय थेट निवडणूकीची प्रथा प्रथम आंमलात आणण्यात आली. त्याचबरोबर मागील घटनेमध्ये स्विकृत सदस्यांची तरतुद करण्यात आली होती. तिचे प्रमाण एकूण सभासद संख्येच्या १० % इतके ठेवून ४ सदस्य स्विकृत करण्याची तरतूद करण्यात आली. अध्यक्षासह निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या ४१ अधिक स्विकृत सदस्य ४ अशी एकूण ४५ होती. या घटनेतील आणखी एक महत्वाचा बदल म्हणजे अध्यक्षपदाची मुदत ५ वर्षे ठेवण्यात येऊन त्यांना पदावरुन दूर करण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या २/३ मते आवशक असण्याची तरतुद केली. याचबरोबर नगराध्यक्षांना लोकनियुक्त मंडळ बरखास्त करण्याचा अधिकार देण्यात आला. मंजूर घटनेनुसार निवडून आलेले लोकनियुक्त मंडळ दि. १७ / १२ / ७४ रोजी अस्तित्वात आले. त्यानुसार,

| | | |
|---|---|---|
| १. | एकूण निवडावयाच्या सदस्यांची संख्या | संख्या |
| २. | निवडावयाची सभासद संख्या ( जनरल ) | ३१ |
| ३. | स्त्री राखीव | ४ |
| ४. | अनुसूचित जातीसाठी | ५ |
| ५. | स्विकृत सदस्य संख्या | ४ |

या दुरुस्तीमुळे अध्यक्षीय थेट निवडणूक पध्दतबंद करण्यात आली. अध्यक्ष निवडून आलेल्या सदस्यातून निवडणे व उपाध्यक्ष अध्यक्षांनी नेमणे अशी दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार वॉर्ड पुनर्रचना करण्यात येऊन जिल्हाधिकारी यांनी आपल्या दि. १४/८/८० च्या आदेशान्वये प्रभाग रचना मंजुर करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग -१ (अ) असाधारण पुणे विभाग , पुणे दि. १४ एप्रिल १९८३ पृ. क्र ८२२ वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. स्त्री राखीव प्रभाग १४, १६, २३, ३३ व अनुसुचित जातीकरीता प्रभाग - २,८,१०,२१,३० या मंजूर घटनेनुसार सार्वत्रिक निवडणूक २४ / ४ / १९८५ रोजी होऊन नवीन लोकनियुक्त मंडळ मे १९८५ पासून अस्तित्वात आले.

माजी पंतप्रधान मा. राजीव गांधी यांनी ३० टक्के राखीव जागा स्त्रियांसाठी देणेचे धोरण ठरवून देशातील स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत समित्यांचे विभागवार सदस्यांची मते अजमावली. या शिबीरात नगराध्यक्षा प्रभावती झाडबुके यांनीही भाग घेऊन स्त्रियांना ५० टक्के राखीव जागेची मागणी केली होती. या चर्चेचा व विद्यमान राष्ट्रीय आघाडीचे सरकारने याचा पाठपुरावा करणेचा निर्धार व्यक्त केला . याबाबतीत ना. शदर पवार यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी महाराष्ट्र राज्य शासनाने पंचायत समित्या व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३०% जागा राखीव ठेवण्याचा कायदा केला. त्याप्रमाणे बार्शी नगरपालिकेत खालील प्रमाणे प्रभागांची जागेची विभागणी होईल.

अ) एकूण निवडायची सदस्य संख्या -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण निवडायचे सदस्य | : | २५ |
| २. | स्त्री राखीव सदस्य संख्या | : | १० |
| ३. | अनुसूचित जातीसाठी सदस्यसंख्या | : | ३ |
| ४. | अनुसूचित स्त्रिजातीसाठी संख्या | : | २ |
| ५. | स्वीकृत सदस्य संख्या | : | ४ |
| | एकूण | | ४४ |

| | | |
|---|---|---|
| स्त्रीयांसाठी राखीव प्रभाग नं. | : | १, ६, १२, १५,१८ |
| अनुसूचित स्त्री राखीव प्रभाग नं. | : | २४, २५, २९,३४,३६ |
| अनुसूचित राखीव प्रभाग नं. | : | २,३०, ८,१०, २१ |
| सर्वसाधारण प्रभाग नं. | : | उरलेले सर्व |

**बार्शी नगरपालिका व राज्यसरकारचे परस्परसंबंध :**

स्थानिक स्वराज्य संस्थांना स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी स्वायत्तता जरी दिलेली असली तरी त्यावर सरकारचे कायदेशीर व न्यायालयीन नियंत्रण असते. तसेच दैनंदिन कारभारावर देखरेख व अर्थिक व्यवहाराची तपासणी असे वर्चस्व सरकारचे असते.

बार्शी नगरपालिका सन १८६५ साली स्थापन झाली व १८९२ पर्यंत सर्व सभासद हे सरकार नियुक्त होते. व अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असत. त्यामुळे या वर्षात सरकारला खास नियंत्रण नगरपालिकेवर ठेवण्याची गरज फारशी भासली नाही.

नगरपालिकेचा आर्थिक व्यवहार बरोबर चालतो की नाही हे पहाण्याकरीता सरकारने हिशोब तपासणीचे नियंत्रण ठेवले आहे. सन १९०७ - ०८ या वर्षापासून सरकारी ऑडिटर्सकडून नगरपालिकेचे हिशोब प्रतिवर्षी तपासण्यात येऊ लागले. यापूर्वी प्रायव्हेट एजन्सीकडून हिशोब तपासणी करुन घेण्याची पध्दती होती. या पध्दतीमुळे जर नगरपालिकेने अनाठायी खर्च केला तर तो वसूल करण्याचा कायदेशीर अधिकार स्वत:कडे ठेवला होता. बार्शी नगरपालिकेच्या स्थापनेपासून ते १९६० पर्यतचा इतिहास पहिला तर केलेला अयोग्य खर्च वसूल करण्याचा प्रसंग आला नाही. न्यायालयीन नियंत्रण नगरपालिकेच्या प्रशासनावर कसे आहे, याचे उत्कृष्ठ उदाहरण बार्शी नगरपालिकेच्या इतिहासामध्ये घडले. सन १९५२ ला नगरपालिकेने मिल्स व कारखाने यांच्यावर घरपट्टी आकारणी स्क्वेअर फुट बेसिसवर बसविण्याचा एक नियम आंमलात आणला. म्हणजे १०० स्कवेअर फुटाला रू. ४०.०० वार्षिक भाड्याचा अंदाज याप्रमाणे आकारणी बसविण्यात आली. परंतु हा नियम चुकीचा आहे. म्हणून लोकमान्य मिल्सने नगरपालिकेवर दिवाणी दावा भरुन केस सुप्रिम कोर्टाकडे नेऊन नगरपालिकेचा नियम रद्द ठरविला. त्यामुळे नगरपालिकेला जमा केलेला कर परत करावा लागला. यावरुन असे दिसते की , न्यायालयीन नियंत्रण नगरपालिकेच्या प्रशासनावर होते.

# संदर्भग्रंथ


१. डॉ. माहेश्वरी एस. आर., लोकल गव्हर्नमेंट इन इंडिया, पृ. सं. - ११४

२. डॉ. माहेश्वरी एस. आर., लोकल गव्हर्नमेंट इन इंडिया, पृ. सं. - ११४

३. रामचंद्र एस. सी., हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया - पृ. सं. २१४

४. छाबरा जी.एस., ॲडव्हान्सड स्टडीइन दी हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, खंड - १, पृ. सं. ४७१

५. रामचंद्र एस सी. हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ. सं. २१४

६. छाबरा जी.एस. ॲडव्हान्सड स्टडीइन दी हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया खंड - १, पृ. क्र. ४७१

७. पाटील अ. आ., आधुनिक भारत, राविले पाब्लिकेशन, पृ.क्र. ११८

८. ग्रोवर बी. एल., आधुनिक भारताचा इतिहास , नवी दिल्ली, २००३, पृ. सं - २४३

९. रामचंद्र एस.सी., हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया , पृ. सं. - २१९

१०. ग्रोवर बी.एल आधुनिक भारताचा इतिहास , नवी दिल्ली, २००३, पृ. सं. - २४२

११. डॉ. एखेळीकर रमेश, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, औरंगाबाद, जून, १९९९, पृ. सं. - ३०

१२. बार्शी नगरपालिका शताब्दी गौरव ग्रंथ, पृ. सं. ९८

१३. तत्रैव ,पृ.सं. ९९

१४. तत्रैव , पृ.सं. ९९

१५. शतकोत्तर रौप्यमहोत्सव स्मृतिग्रंथ, बार्शी नगरपालिका, १९९०

१६. तत्रैव , पृ. स. - १०१

१७. बार्शी नगरपालिका शताब्दी गौरव ग्रंथ, पृ. सं. - १०१

१८. शतकोत्तर रौप्यमहोत्सव स्मृतिग्रंथ, बार्शी नगरपालिका, १९९०